जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५०९ दिनांक - ०४/१२/२०२४**

गुन्हे शाखा युनिट २ पुणे शहर

## puma कंपनीचा लोबो वापरून बनावट मालाची विक्री करणा-या शॉपमधुन ८,०२,६००/-रू.कि.चा मुद्देमाल जप्त

पुणे शहरात वेगवेळया ठिकाणी ब्रॅन्डेड कंपनीचा बनावट मालाची विक्री होत असलेबाबत माहिती मिळाली होती. त्या अनुषंगान कारवाई करणेकामी मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी प्रताप मानकर,यांचे पथकातील अधिकारी अंमलदार व puma कंपनीचे अधिकृत प्रतीनिधी मार्फत पुणे शहरात शोध मोहिम चालू असताना प्राप्त माहितीनुसार, आंबेगाव बुद्रुक लिपाणे वस्ती कात्रज पुणे येथील stylox fashion hub या शॉपमध्ये मोठया प्रमाणावर puma या ब्रॅडेड कंपनीचे लोबो वापरुन बॅग, टि शर्ट, स्पोटस शुज, स्लाईडर चप्पल, जॅकेट, ट्रॅाव्हझर, बॉक्सर पॅन्ट विक्री चालू होती त्याप्रमाणे सदर माहितीची खात्री केली.

दिनांक ३/१२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट २ कडील पथकाने आंबेगाव बुद्रुक निपानी वस्ती कात्रज पुणे येथील stylox fashion hub या शॉपमध्ये छापा कारवाई केली असता सदर शॉपमध्ये एकुण ८,०२,६०० रु.चा किमंतीचा puma या ब्रॅडेड कंपनीचे लोबो वापरुन बॅग, टि शर्ट, स्पोटस शुज, स्लाईडर चप्पल, जॅकेट, ट्रॅाव्हझर, बॉक्सर पॅन्ट असा मुददेमाल जप्त केला असून असून शॉप मालक याचेवर आंबेगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्रमांक १०१८/२०२४ कॉपीराईट ॲक्ट १९५७ चे कलम ५१,६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी,मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर,सहा. पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक नितिन कांबळे, पोलीस अंमलदार शंकर नेवसे, अमोल सरडे, ओमकार कुंभार, संजय आबनावे,विनोद चव्हाण ,पुष्पेद्र चव्हाण, साधना ताम्हाणे, विजय पवार, प्रमोद कोकणे,निखिल जाधव,गणेश थोरात नागनाथ राख या पथकाने केली आहे.





